

# चहा, भाजीचा व्यापार!

**(भाग २)**

## बडोद्याचा अपेक्षाभंग

एक दिवस मोठ्या उत्साहात रायकर बाहेरून आला. मला म्हणाला, "सुधीर, आपण बडोद्याला जायचं का? बडोद्याच्या महाराजांचा राज्याभिषेक समारंभ आहे. लाखो रुपये खर्च होणार असतील. तिथं तुझा कार्यक्रम करायची खटपट मी करतो आहे. अविनाश शहा म्हणून माझे एक मित्र बडोद्याला आहेत, त्यांना पत्र लिहून विचारतो, ते काही खटपट करतात का ते."

मला आनंद झाला. हा माझा मित्र मला केवळ राहायला जागा देऊनच थांबला नाही तर मला पैसे मिळवून द्यायचीही खटपट करतो आहे, या जाणिवेनं मी भारावून गेलो.

रायकरनं लगेच पत्र लिहिलं. चार दिवसांनी उत्तर आलं की, "खटपट करू, तुम्ही इथं या." रायकरनं त्याच दिवशी बडोद्याला जायचं ठरवलं. इथपर्यंत सारं ठीक झालं. पण बडोद्याला जायला बरेच पैसे लागणार होते, ते कुणाकडे होते? रायकरचं ठीक होतं. तो स्वत:चा खर्च करू शकत होता. पण माझाही खर्च त्यालाच करायला सांगणं योग्य नव्हतं. पुन्हा गंभीर पेच उभा राहिला. राज्यारोहण-समारंभात गाण्याची संधी मिळाली असती, तर पुष्कळ पैसे मिळाले असते. पुष्कळ म्हणजे निदान पन्नास-पाऊणशे रुपये तरी. तेवढ्या भांडवलावर क्लास काढता आला असता. रायकरची जागा होतीच. निदान दहा रुपये तरी आता जवळ हवे होते. काय करावं ते सुचेना. एवढे पैसे कोण देणार?

बडोद्याला पैसे निश्चित मिळतील, ही रायकरची खात्री होती. खूप विचार केला. अनेक माणसं नजरेसमोर आणली. कुणाहीकडं हात पसरायला मन धजेना. विशेष ओळखीच्या लोकांकडे जाणं मी केव्हाच सोडून दिलं होतं. एक ठिकाण होतं. पण तिथं जायला मन तयार होईना. ते ठिकाण म्हणजे माझा भाऊ नाना. तो श्री. भीमराव काळसेकरांच्याकडे ड्रायव्हर होता. त्याला पगार होता चाळीस रुपये. राहायचा त्यांच्याच जागेत. खरं म्हणजे आम्हा साऱ्या भावांचं एकमेकांवर अतोनात प्रेम. पण मामांनी, 'तू आम्हांला मेलास, आम्ही तुला मेलो. यापुढं मिरज, जमखंडी, कोल्हापूर सारं बंद. मामा, दादा, नाना, कोणी तुझ्याशी कसलाही संबंध यापुढं ठेवणार नाहीत,' असं सांगितल्यापासून मीच त्यांच्याकडे जाणं सोडून दिलं होतं. आता दहा रुपयांसाठी त्याच्याकडे जाणं लाजिरवाणं वाटत होतं.

पण दुसरा एक विचार मनात आला, बडोद्याला पैसे मिळतीलच मिळतील. मिळाले की, लगेच पैसे परत करू. शेवटी या विचारानं माझ्या स्वाभिमानावर मात केली आणि

मी नानाकडे गेलो. रायकरच्या घरापासून दहा-बारा घरं सोडली की, ठाकुरद्वारच्या नाक्यावर भीमरावाडीत तो राहत होता. मी त्याच्याकडे पैसे मागितले. 'बडोद्याहून आल्याबरोबर तुझे पैसे परत करतो,' असं आश्वासन त्याला दिलं. त्यानं दहा रुपये काढून दिले.

संध्याकाळच्या गाडीनं मी आणि रायकर बडोद्याला जायला निघालो. दि. २३ एप्रिल १९३९ ला सकाळी बडोद्याला पोचलो. दि. २६ एप्रिलला प्रतापसिंह महाराजांचा राज्यारोहण समारंभ होता. हे सगळे दिनांक माझ्या पूर्णपणे स्मरणात आहेत. रायकरचे मित्र श्री. अविनाश शहा दांडिया बाजारात राहात होते. त्यांच्याकडं मुक्काम ठोकला. तो दिवस तसाच गेला. अविनाशभाई दिवसभर जा-ये करीत होते. आम्ही त्यांच्याकडून काहीतरी कळेल, म्हणून उत्सुकतेनं सारखी वाट पाहात होतो. मनात खात्री होती की, भेटल्याबरोबर ते कार्यक्रम ठरल्याची वार्ता सांगतील.

दुपारी जेवण करून जरा आडवे झालो. झोप येत नव्हतीच. कार्यक्रमात काय गावं, याचाच विचार करीत होतो. किती वेळ गायला मिळेल, साथीदार कसे मिळवता येतील, ऐकायला लोक कशा प्रकारचे असतील? असलेच विचार चालले होते. त्या दिवशीची रात्र झाली, तरी काही कळेना. अविनाशभाई रात्री पुन्हा बाहेर गेले. त्यांची वाट पाहून रायकर आणि मी झोपलो. झोप कुठली यायला? देवाला प्रार्थना करीत होतो की, 'देवा, काहीही करून मला एक तरी कार्यक्रम मिळेल असं कर.'

दि. २४ ला सकाळी उठलो आणि चहा पितापिता अविनाशभाईंनी सांगितलं. 'काही जमत नाही. मी पुष्कळ प्रयत्न केले. पण काही उपयोग झाला नाही.' त्यांना वाईट वाटत होतं. पण मी मात्र खलास झालो! डोळ्यांसमोर नानाकडून घेतलेले दहा रुपये अक्राळविक्राळ रूप धारण करून नाचू लागले. अविनाशभाईंनी काही नावं सुचवली. रायकरही जिद्दीनं खटपटीला लागला. त्याच्या काही ओळखी होत्या. कन्याशाळेच्या प्रिन्सिपॉल श्रीमती गंगूताई पटवर्धनांच्या शाळेतील मुली राज्यारोहण-समारंभात प्रथम गाणं म्हणणार होत्या. त्यांच्याकडून वशिला लागेल, म्हणून त्यांना भेटलो. श्रीमती इंदुमती आरते यांना भेटलो. श्री. माणिकरावांना भेटलो. पण यांपैकी कुणीच काही करू शकले नाहीत. चौकशी करताकरता कळलं की, 'राजरत्न वा. वि. जोशी यांच्याकडे कार्यक्रमाची बरीचशी सूत्रं आहेत. त्यांनी मनात आणलं तर काम होईल.' यातच तो दिवस संपला. दि. २५ ला सकाळी त्यांच्याकडे गेलो. मोठ्या आशेनं. मी मुंबईहून कसा आलो, ते त्यांना सांगितलं. 'कसंही करून एक कार्यक्रम घडवून आणा,' असं काकुळतीनं हात जोडून विनवलं. पण काही उपयोग झाला नाही. त्यांचाही नाइलाज होता. राज्यारोहण-समारंभाचे सारे कार्यक्रम काही महिने अगोदर ठरत होते. आता सर्व काही योजून झालं होतं. इतक्या आयत्या वेळी, समारंभाला एकच दिवस उरला असताना काही करणं अशक्य होतं. ते म्हणाले, "तुम्ही बडोद्याला आल्याबरोबर माझ्याकडे आला असतात, तरी मी काही खटपट करू शकलो असतो, पण आता काही शक्य नाही."

मी आणि रायकर मुकाट्यानं बाहेर आलो. सारे मार्ग खुंटले. मुंबईला परत जाण्यासाठी लागणाऱ्या पूर्ण भाड्याइतके पैसे शिल्लक नव्हते. तो दिनांक होता २५ एप्रिल १९३९. दुसऱ्या दिवशी राज्यारोहण-समारंभ. मी रायकरला म्हटलं, "आपण मुंबईला परत जाऊ या. हे सारं माझ्याच्यानं पाहावत नाही." रायकर तयार झाला. पण त्याच्या गुजराती मित्रानं आग्रहानं एक दिवस राहायला लावलं. त्याचं म्हणणं, "इतके आलाच आहात तर निदान राज्यरोहणाच्या दिवशीची मजा तर पाहून जा." आम्ही त्याचं मन मोडलं नाही. नाहीतरी एका दिवसानं माझ्या दुर्दैवात जास्त कोणती भर पडणार होती?

त्या रात्री आम्ही बाहेर पडलो. सारं शहर विजेच्या दिव्यांच्या रोषणाईनं लखलखत होतं. झेंडे, पताका, कमानी, रंगीबेरंगी प्रकाश यांनी उजळून निघालं होतं. सनई, चौघडे, बॅन्ड, ताशे, गरबे यांचा नुसता जल्लोष चालला होता. आनंद ओसंडून वाहात होता. वैभव जणू काही इंद्राच्या अमरावतीला वाकुल्या दाखवत होतं. राज्यारोहणाच्या सोहळ्यासाठी पंधरा लाख रुपये खर्च होणार होते. पंधरा लाख... त्यांतले एकशे पन्नास, नव्हे नुसते पन्नास, अगदी निदान पंधरा रुपये मला मिळाले असते, तरी मी सुखरूप मुंबईला परतू शकलो असतो. मन अतिशय विषण्ण झालं. चूक कुणाचीच नव्हती. होती केवळ माझ्या नशिबाची. एक महिना, निदान पंधरा दिवस आधी मी खटपट करू शकलो असतो, तर ही अशी पाळी आली नसती. पण हे पुनःपुन्हा उपटणारं जर-तर...

मी एकदम रायकरला म्हटलं, "रायकर, तुला माहीत आहे ही सारी रोषणाई कुणासाठी आहे ते? माझ्यासाठी, या सुधीर फडक्यासाठी! हे महाराजबिराज ठेव बाजूला, आज सुधीर फडक्यांचं वास्तव्य या शहरात आहे म्हणून ही रोषणाई, हा आनंदोत्सव आहे! अरे, आज या बडोदेकरांनी मला नकार दिला आहे, पण तेच कधीतरी माझ्याकडे येतील, मला विनवतील, 'काहीही करा; पण एक तरी कार्यक्रम आमच्या बडोद्याला द्या,' असं म्हणतील."

मी माझ्या मनातली निराशा एकदम झटकून टाकली. मध्यरात्रीपर्यंत दोघंही भटकलो. मध्यरात्री आम्ही रायकरच्या मित्राच्या घरी यायला निघालो. तो भाग जवळ येऊ लागला, तसा दिव्यांचा लखलखाट कमी कमी होऊ लागला. खुद्द त्या भागात आम्ही शिरलो, तेव्हा तिथं अंधारगुडूप होतं. मागं पाहिलं तर लखलखाट आणि समोर पाहिलं तर निबिड अंधार. आशा-निराशेचा एक सुंदर पण भयाण खेळच जणू! मनात एकदम विचार चमकून गेला. एका माणसाला गादीवर बसण्यासाठी पंधरा लाख रुपयांची उधळपट्टी. इतक्या प्रचंड रकमेचा चुराडा. कुणाचे हे पैसे? त्याच्याकडे कुठून आले? काय कर्तबगारी त्याची? सारा पैसा गरीब बिचाऱ्या लोकांचा. त्यांच्या श्रमाचा, आणि दिमाखानं मिरवणारी चैन मात्र याची. त्यापेक्षा हा सारा पैसा याच गरिबांना, गरजूंना वाटून दिला असता तर? या पंधरा लाखांतले शे-पन्नास मला मिळाले असते, तरीही हा विचार माझ्या मनात आलाच असता. फक्त त्याची तीव्रता थोडी कमी झाली असती.

उद्या काहीही झालं तरी बडोद्यात थांबायचं नाही, असा मी मनाशी निश्चय केला. पण

जायचं कुठं आणि कसं? मुंबईला जायला भाड्याचे पुरे पैसे नाहीत. वाटलं, अहमदाबादला जावं. तिथं पुष्कळ मराठी लोक आहेत. कुणाला तरी हात जोडून विनवावं, माझा कार्यक्रम करा म्हणून. नशिबाची परीक्षा तरी पाहू या. रायकरला ही कल्पना सांगितली. तो म्हणाला, "तू अवश्य खटपट कर. मी मात्र मुंबईला परत जातो. २७ ला परत येईन, असं सांगून आलोय. माझी कामं, माझे पेशंट माझी वाट पाहात असतील."

आता आठवत नाही, पण बडोद्यातल्या कुणीतरी मला अहमदाबादमधल्या कुणा सद्गृहस्थांचा पत्ता दिला. दि. २६ ला सायंकाळी मी अहमदाबादला पोचलो. त्या गृहस्थांच्याकडे गेलो. त्याचं नाव आठवत नाही, पण ते गिरणीत काम करीत होते, एवढं आठवतं. त्यांनी आपलेपणानं मला ठेवून घेतलं. कार्यक्रम व्हावा, म्हणून बरीच खटपटही केली, पण काही जमलं नाही. त्यांनी दुसऱ्या दिवशी दुपारी तसं सांगितलं.

आता मात्र मी खरोखर संपलो! काय करावं, कुठं जावं आणि जावं तरी कसं, काही काही समजेना. मुकाट्यानं उठलो. त्यांचे आभार मानले. पिशवी घेतली. चालत चालत स्टेशनवर आलो. किती वेळ चालत होतो, तेही कळलं नाही. मुंबईला जाणारी गाडी प्लॅटफॉर्मला लागलेली होती. सरळ जाऊन वरची फळी धरली. उशाला पिशवी घेऊन झोपून गेलो. गाडी केव्हा सुरू झाली, तेही कळलं नाही. मध्ये जाग आली, तेव्हा तिकीट चेकर डब्यात आलेला पाहिला. एकदम एक कल्पना मनात आली. खाली उडी मारावी आणि चेकरला सांगावं की, माझ्याकडे तिकीट नाही. तो मला पकडून नेईल. पोलिसांच्या ताब्यात देईल. ते मला तुरुंगात नेऊन बसवतील... आठ दिवस, पंधरा दिवस.. किती छान होईल! नानाला दहा रुपये परत देण्याची काळजी तितके दिवस तरी पुढे जाईल. नाहीतरी त्याला उद्या तोंड कसं दाखवायचं?

हे सगळे विचार मनात आले, पण ते कृतीत उतरवायचा धीर झाला नाही. सभ्य संस्कृतीचा लाचार भित्रेपणा आड आला. मी डोळे मिटून तसाच पडून राहिलो. डबा माणसांनी खचाखच भरला होता. बऱ्याच वेळानं हळूच डोळे उघडून पाहिलं तर तिकीट चेकर निघून गेला होता. पुढं काय करायचं काहीच ठरवलं नव्हतं. पण लाचाराला आणि गरजूला मार्ग पटापट सुचतात. पहाटे गाडी बोरिवली किंवा अंधेरी स्टेशनवर थांबली. गाडी पूर्ण थांबायच्या आधीच मी डब्यातून प्लॅटफॉर्मवर उडी घेतली. समोरच एक दगडी बाक होतं. त्यावर पटकन झोपून गेलो. जणू त्या पॅसेंजर गाडीतून मी आलोच नव्हतो. काही मिनिटांत एक एक लोकल समोरच्याच प्लॅटफॉर्मला येऊ लागले. मी लोकलमध्ये बसलो. चर्नीरोड स्टेशनवर उतरलो. गर्दीच्या लोंढ्याबरोबर सुखरूप स्टेशनच्या बाहेर पडलो. अंगातली शक्ती संपली होती. हातापायांत त्राण उरलं नव्हतं. कसाबसा रायकरच्या खोलीत आलो. रायकरनं माझ्याकडं पाहिलं आणि तो काय समजायचं ते समजला.

– कै. सुधीर फडके

(श्री. श्रीधर फडके यांच्या परवानगीने 'जगाच्या पाठीवर' या आत्मचरित्रातून क्रमशः)

('जगाच्या पाठीवर' पुस्तकासाठी भारतातील संपर्क – दिलीप माजगावकर ४४७३४५९)